स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर

५३९,राजेंद्रनगर,कोल्हापूर-४१६ ००४.

Office Phone Chairman- (0231) 2690829(O)2690679 (R) Secretary -2691405 (O) 2656044 (R)
EPBX 2696101,102,103,Fax -2690758E-mail divsec.kop@gmail.com

क्र.कोविम./माध्य परीक्षा-२३/4597
कोल्हापूर.४१६००४.
दिनांक - १५/०३/२०२३

प्रति,

मुख्याध्यापक,
सर्व माध्यमिक शाळा,
सातारा /सांगली/ कोल्हापूर

**विषय :- मार्च २०२३ मध्ये घेण्यात आलेल्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षेस प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांना शास्त्रीय कला, चित्रकला व लोककला अतिरिक्त गुण प्रस्ताव सादर करण्यास मुदतवाढ देणेबाबत..**

**संदर्भ :-** १. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय संकीर्ण-२०१६/प्र.क्र.२०२/एस.डी-२ दि.२४/११/२०२७
२. राज्यमंडळ, पुणे यांचे जा.क्र.रा.मं./परीक्षा-७/४९२ दि.३१/०१/२०२३ चे पत्र
३. राज्यमंडळ, पुणे यांचे जा.क्र.रा.मं./परीक्षा-७/१२३६ दि.१५/०३/२०२३ चे पत्र

उपरोक्त विषयास अनुसरुन संदर्भीय पत्र क्र. ०३ अन्वये माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षेस प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांना शास्त्रीय कला, चित्रकला व लोककला अतिरिक्त गुण प्रस्ताव सादर करण्यास **सोमवार दि.२० मार्च २०२३ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत** मुदतवाढ देण्यात येत आहे. सदरची मुदतवाढ ही अंतिम असेल यानंतर कोणत्याही परिस्थितीत मुदतवाढ देण्यात येणार नाही व आपल्या माध्यमिक शाळेतील कोणताही पात्र विद्यार्थी सदर गुणांच्या सवलतीपासून वंचित राहणार नाही याची दक्षता घ्यावी.

(दत्तात्रय पोवार),
विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर

सोबत - राज्यमंडळ, पुणे यांचे दि.१५/०३/२०२३ चे प्रकटण

117 – d/khamkar sm 10th exam / 11th cet prakatan letter format

# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे ४११ ००४.

# प्र क ट न

**विषय– मार्च २०२३ मधील माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षेस प्रविष्ठ होणा–या विद्यार्थ्यांना शास्त्रीय कला, चित्रकला व लोककला प्रस्ताव सादर करण्यास मुदतवाढ देणेबाबत.**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांचे संलग्न असलेल्या सर्व माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक , शिक्षक, विद्यार्थी व पालक यांना सूचित करण्यात येते की, शासन निर्णय दिनांक २४/११/२०१७ नुसार माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षेस प्रविष्ठ होणाऱ्या शास्त्रीय कला, चित्रकला क्षेत्रात प्राविण्य मिळविणाऱ्या व लोककला प्रकारात सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांना सवलतीचे अतिरिक्त गुण देण्याबाबत कळविण्यात आलेले आहे.

विविध स्तरावरून मागणी होत असल्याने शास्त्रीय कला, चित्रकला व लोककलेचे प्रस्ताव सादर करण्यास यापूर्वी दि. ८ फेब्रुवारी, २०२३ अशी मुदतवाढ देण्यात आलेली होती.

तथापि काही तांत्रिक अडचणींमुळे निर्धारीत करण्यात आलेल्या वाढीव मुदतीत माध्यमिक शाळांना अतिरिक्त गुणांचे प्रस्ताव सादर करता आले नसल्याने तसेच कोणताही पात्र विद्यार्थी अतिरिक्त गुणांपासून वंचित राहू नये म्हणून शास्त्रीय कला, चित्रकला व लोककलेचे अतिरिक्त गुणांचे प्रस्ताव सोमवार, दि. २० मार्च, २०२३ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत माध्यमिक शाळांकडून स्विकारण्यास मुदतवाढ देण्यात येत आहे. सदरची मुदतवाढ अंतिम असेल यानंतर कोणत्याही परिस्थितीत मुदतवाढ देण्यात येणार नाही याची दक्षता घ्यावी.

तरी उपरोक्त विहीत मुदतीत सर्व विभागीय मंडळांनी योग्य ती कार्यवाही करावी. सदर मुदतवाढ आपल्या कार्यकक्षेतील सर्व माध्यमिक शाळांच्या निदर्शनास आणून देवून त्याप्रमाणे मुदतीत कार्यवाही करण्याबाबत सर्व संबंधितांना सूचित करावे. तसेच आपल्या स्तरावरुन याबाबत प्रसिध्दी देण्यात यावी व कोणताही पात्र विद्यार्थी सदर गुणांच्या सवलतीपासून वंचित राहणार नाही याची संबंधितांनी दक्षता घ्यावी.

(अनुराधा ओक)
सचिव
राज्यमंडळ, पुणे–०४

दिनांक : १५/०३/२०२३